




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25






वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ११७ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । १६/०५/२०२६ । पाने - ६






# पेट्रोल-डिझेलचा भडका; सर्वसामान्यांवर महागाईचा तडका

## दोन वर्षांनंतर इंधन दरवाढ आजपासून नवीन दर लागू


एकिकडे भाववाढीचा फटका जनतेला बसत असताना दुसरीकडे पेट्रोल, डिझेलचा तुटवडा निर्माण झाला आहे. संगमनेर शहरातील अनेक पंप असे ओस पडलेले दिसत आहे.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -देशभरातील सर्वसामान्य नागरिकांना पुन्हा एकदा महागाईचा मोठा झटका बसला आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर तब्बल ३-३ रुपयांची वाढ करण्यात आली असून, नवीन दर आज १५ मेपासून लागू झाले आहेत. राजधानी दिल्लीत पेट्रोलचा दर आता ९७.७७ रुपये प्रति लिटर तर डिझेल ९०.६७ रुपये प्रति लिटरवर पोहोचले आहे. जवळपास दोन वर्षांनंतर झालेल्या या वाढीमुळे वाहतूक, शेती, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेल्या प्रचंड वाढीमुळे तेल कंपन्यांवर आर्थिक दबाव निर्माण झाला आहे. इराण-अमेरिका संघर्ष तीव्र होण्यापूर्वी क्रूड ऑइलचे दर ७० डॉलर प्रति बॅरल होते. मात्र सध्याच्या भू-राजकीय तणावामुळे हे दर १०० डॉलरच्या पुढे गेले आहेत. त्यामुळे सरकारी तेल कंपन्यांनी तोट्याची भरपाई करण्यासाठी दरवाढीचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

मार्च २०२४ पासून देशात पेट्रोल-डिझेलचे दर स्थिर ठेवण्यात आले होते. लोकसभा निवडणुकांपूर्वी केंद्र सरकारने प्रति लिटर २ रुपयांची कपात करून जनतेला दिलासा दिला होता. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढत्या किमती आणि कंपन्यांचा तोटा यामुळे अखेर दरवाढ अटळ ठरली.

आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या १५ दिवसांच्या सरासरी किमतीनुसार दर निश्चित केले जातात. परंतु राजकीय संवेदनशीलतेमुळे दीर्घकाळ दर स्थिर ठेवण्यात आले होते.

### इंधनाचा वापर कमी करा - पंतप्रधान

**पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही नागरिकांना इंधनाचा वापर संयमाने करण्याचे आवाहन केले आहे. तेलंगणातील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर केवळ गरजेनुसारच करण्याचा सल्ला दिला. इंधन बचतीमुळे परकीय चलन वाचेल आणि युद्धजन्य परिस्थितीचे दुष्परिणामही कमी होतील, असे मोदी यांनी म्हटले होते.**

### दरवाढीमुळे काय महाग होणार?

- प्रवासी वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता
- मालवाहतुकीचे दर वाढणार
- भाजीपाला, धान्य व किराणा महागण्याची चिन्हे
- शेतीसाठी लागणाऱ्या डिझेल खर्चात वाढ
- खासगी वाहनधारकांच्या खर्चात मोठी भर

### सरकारने आधी काय केले होते?

**पेट्रोलवरील विशेष उत्पादन शुल्क १३ रुपयांवरून ३ रुपये, डिझेलवरील शुल्क १० रुपयांवरून शून्यावर, पेट्रोलवरील एकूण केंद्रीय उत्पादन शुल्क २१.९० वरून ११.९० रुपये, डिझेलवरील शुल्क १७.८० वरून ७.८० रुपये, सरकारचा उद्देश पेट्रोल-डिझेलचे दर स्थिर ठेवण्याचा होता. मात्र आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे आता दरवाढ अपरिहार्य ठरल्याचे मानले जात आहे.**

तज्ज्ञांच्या मते, जर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती दीर्घकाळ उच्च स्तरावर राहिल्या, तर पेट्रोल-डिझेलचे दर आणखी वाढू शकतात. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावरील भार वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. सरकारच्या माहितीनुसार इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम यांसारख्या सरकारी कंपन्यांना पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी विक्रीवर दरमहा सुमारे ३० हजार कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत होता.

# कत्तलखान्यावर छापा

## १२ जनावरे ताब्यात, गुन्हा दाखल

युवावार्ता (वृत्तसंस्था)

संगमनेर - शहरातील मदिनानगर परिसरात गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने निर्दयतेने बांधून ठेवल्याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल १२ जिवंत गोवंशीय जनावरे ताब्यात घेतली असून त्यांची एकूण किंमत २ लाख ६० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांना दि. १४ मे २०२६ रोजी सायंकाळी मदिनानगर गल्ली क्रमांक १ येथील हावडा ब्रिज नाल्याशेजारील काटवन परिसरात गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी छापा टाकला.

- छाप्यामध्ये काही जिवंत गोवंशीय जनावरे चारा-पाण्याविना निर्दयतेने बांधून ठेवल्याचे आढळून आले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या व्यक्तीकडे चौकशी केली असता सदर जनावरे सय्यद राजमोहंमद सय्यद आरिफ, रा. मदिनानगर, संगमनेर यांची असल्याचे समोर आले. या कारवाईत पोलिसांनी १० काळ्या-पांढऱ्या रंगाची गोवंशीय जनावरे प्रत्येकी २० हजार रुपये किंमतीची तसेच २ गोवंशीय जनावरे प्रत्येकी ३० हजार रुपये किंमतीची असा एकूण २ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९९५ (सुधारीत २०१५) कलम ५(अ), ९ तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागणूक प्रतिबंधक कायदा कलम ३ व ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# सार्वजनिक ठिकाणी सभा, मिरवणूका नको




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील वाढती गर्दी, वाहतूक कोंडी आणि सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर संगमनेर नगरपरिषद व पोलीस प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या राजकीय व सार्वजनिक कार्यक्रमांबाबत कडक भूमिका घेतली आहे. मुख्य रस्ते, चौक तसेच गर्दीच्या ठिकाणी राजकीय सभा, मिरवणुका, वाढदिवस साजरे करणे किंवा अन्य सार्वजनिक कार्यक्रम विनापरवाना आयोजित करू नयेत, असे स्पष्ट आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

नगरपरिषदेकडून जारी करण्यात आलेल्या सूचनेनुसार, रस्त्यावर गर्दी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, ध्वनीप्रदूषण करणे किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणारे कार्यक्रम आयोजित केल्यास संबंधितांवर नगरपरिषद व पोलीस प्रशासनाकडून तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

तसेच कोणताही सार्वजनिक किंवा राजकीय कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी संगमनेर नगरपरिषद आणि संबंधित पोलीस ठाण्याची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्व नागरिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे आणि मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी केले आहे.


















# औद्योगिक संशोधनात नवे योगदान

## डॉ. प्रा. योगेश गुंजाळ यांना पीएच.डी. पदवी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी **Experimental Investigation into Assisted Heating and Cooling Approach in FSW of Steel to Aluminium Joints** या विषयावर संशोधन पूर्ण केल्याबद्दल डॉ. प्रा. योगेश रामराव गुंजाळ यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली. हे संशोधन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील संशोधन केंद्रात करण्यात आले असून या संशोधनासाठी त्यांना डॉ. विजय गडाख यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. प्रा. योगेश गुंजाळ हे अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था, संगमनेर चे उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील गुंजाळ ह्यांचे बंधू यशवंतराव गुंजाळांचे नातू आणि जेष्ठ शिवसेना नेते रावसाहेब गुंजाळ ह्यांचे ते पुतणे आहेत. ते अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, संगमनेर येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या संशोधनामुळे ऑटोमोबाईल उद्योगात वजन कमी करणे, वाहनांची मायलेज वाढवणे तसेच मजबूत व टिकाऊ जोड तयार करणे यासाठी मोठी मदत होणार आहे.

या संशोधनाच्या माध्यमातून प्रा. डॉ. योगेश गुंजाळ यांनी २ एससीआय दर्जाचे संशोधन लेख, २ आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधनपत्रे सादर केली आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय संशोधन कार्यामुळे औद्योगिक क्षेत्रात नवे तंत्रज्ञान विकसित होण्यास चालना मिळणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल बाळासाहेब भाऊसाहेब थोरात ( माजी महसूल मंत्री, महाराष्ट्र शासन), मा. आ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, रणजितसिंह देशमुख, चेअरमन, राजहंस दूध संघ, विश्वस्त शरयूताई देशमुख, ए. बी. शिंदे, प्रा. व्ही. बी. धुमाळ, डॉ. प्रा. जे. बी. गुरव, तसेच प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश, प्रा. व्ही. पी. वाघे, डॉ. प्रा. आर. आर. नवथर, डॉ. प्रा. एस. एम. मगर, डॉ. प्रा. के. एम. मरकड व त्यांचे सर्व मित्र परिवार यांनी अभिनंदन केले आहे.

पीएच.डी. पदवी मिळाल्यामुळे प्रा. योगेश गुंजाळ यांच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील योगदानाची दखल घेतली जात असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# भोंदू खरातची भक्ती भोवली, उपजिल्हाधिकारी निलंबित





युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात राजकीय नेत्यांनंतर आता प्रशासकीय अधिकारीही अडचणीत आले असून खरात सोबत आर्थिक व्यवहार केल्याच्या आरोपावरुन उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे-पाटील यांचे निलंबन करण्यात आल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी केली.

झोपडपट्टी पुनर्वनस प्राधिकरणात सक्षम प्राधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या भांडे-पाटील यांचे भोंदूबाबा अशोक खरात सोबत आर्थिक व्यवहार केल्याची बाब समोर आली होती. अशोक खरातच्या मुलीच्या आणि पत्नीच्या नावे असलेल्या जमिनीमध्ये गुंतवणूक केल्याप्रकरणी भांडे- पाटील यांची अडचण वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अशोक खरात याच्यासोबतच अभिजित भांडे याचे कॉल रेकॉर्डस हाती आल्यानंतर महसूलमंत्र्यांनी त्याच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत. खरात आणि अभिजीत भांडे यांच्यामध्ये तब्बल १४३ वेळा फोन कॉल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये अशोक खरातने अभिजीत भांडेला ८३ वेळा कॉल केले आहेत. तर भांडेने खरातला ६० वेळा फोन केल्याचे सांगितले जाते आहे.

महसूल विभागाने काढलेल्या निलंबन आदेशानुसार अभिजित भांडे पाटील, उपजिल्हाधिकारी यांचे संघटित गुन्हेगारी, फसवणूक व शोषणाचे गुन्हे दाखल असलेल्या अशोक खरात सोबत निकटचे संबंध असल्याबाबत विविध प्रसार व समाजमाध्यमांवर गंभीर स्वरूपाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. तसेच त्यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करुन सदर व्यक्तीस बेकायदेशीर फायदा पोहोचवणे, गोपनीय माहिती लीक करणे आणि आर्थिक लाभ मिळवणे अश्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या प्राथमिक अवलोकनावरून भांडे पाटील यांची सदर वर्तणूक ही एका शासकीय अधिकाऱ्याला अशोभनीय असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यांच्या या कृत्यामुळे जनमानसात शासनाची प्रतिमा मलिन झाली आहे. त्यांचे हे वर्तन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ च्या तरतुदींचे उल्लंघन करणारे असल्याने श्री. भांडे पाटील, उपजिल्हाधिकारी यांच्याविरुद्ध उपरोक्त कारणास्तव विभागीय चौकशी करण्याचे योजिले आहे. सदर प्रकरणाचे गांभीर्य आणि सार्वजनिक हित विचारात घेता, त्यांना शासकीय कर्तव्य पार पाडण्यापासून दूर ठेवणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे. सबब महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार श्री. भांडे पाटील यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई करण्याच्या अधिनतेने त्यांना शासनसेवेतून निलंबित करण्यात येत आहे.

जाहिरात तुमची प्रतिसाद आमचा
दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

# धर्मवीर संभाजी महाराजांचा बलिदान इतिहास तरुणांनी प्रत्यक्ष अनुभवावा - आ. अमोल खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- स्वराज्य आणि धर्मरक्षणासाठी ज्या हालअपेष्टा व अमानुष यातना धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी सहन केल्या आणि अखेर स्वतःचे बलिदान दिले, त्या बलिदानाचा इतिहास आजच्या तरुण पिढीने तुळापूर आणि वढू बुद्रुक येथे प्रत्यक्ष जाऊन अनुभवावा असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले.

स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठान आणि शिवशंभू विचार मंच, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने येथील जाणता राजा मैदानावर आयोजित 'प्रतापगडपर्व' या महानाट्याचा शुभारंभ आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते मार्गदर्शन करत होते. या प्रसंगी व्यासपीठावर सुभेदार तानाजी मालुसरे यांचे तेरावे वंशज रायबा मालुसरे, ज्येष्ठ विचारवंत व शिवचरित्रकार एस. झेड. देशमुख, भाजप कार्यकारिणी सदस्य दादाभाऊ गुंजाळ, सामाजिक कार्यकर्त्या नीलम खताळ विनायक वडतल्ले, श्रीप्रसाद कानडे, राहुल बोरे, विश्वेश मोहरीकर, विनायक वाडेकर ,रोशन कोथमिरे, लाला दायमा, संकेत मैड,युवराज निचळ पुनम दायमा , नीता मोहरीकर, रेखा गलांडे, दीपाली वाव्हळ, स्वाती मुंडलिक आदी मान्यवर उपस्थित होते

आमदार खताळ म्हणाले की, अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या गड-किल्ल्यांचे संवर्धन जतन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्यातील महायुती सरकारने युनेस्कोच्या माध्यमातून घेतला आहे. पूर्वीच्या काळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर संभाजी महाराज यांचा इतिहास अनेकांनी चुकीच्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठान गेल्या अनेक वर्षांपासून हिंदू धर्मरक्षक संभाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास जनमानसात जागविण्याचे कार्य करत आहे. प्रतिष्ठानचे उपक्रम प्रेरणादायी असून, आपण आमदार नसतानाही या संस्थेच्या पाठीशी ठामपणे उभे होतो आणि आता आमदार म्हणूनही प्रतिष्ठानच्या प्रत्येक धर्मकार्यास संपूर्ण सहकार्य राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

ज्येष्ठ विचारवंत एस. झेड. देशमुख म्हणाले की, धर्मवीर संभाजी महाराजांनी तब्बल ४० दिवस अमानुष छळ सहन करूनही धर्मत्याग नाकारला. त्यांच्या त्यागातून संपूर्ण महाराष्ट्रात नवचैतन्य निर्माण झाले. त्यामुळे हिंदू समाजाने इतिहासाबाबत उदासीन न राहता अधिक सजग होणे आवश्यक आहे.

रायबा मालुसरे यांनी सुभेदार तानाजी मालुसरे यांच्या शौर्यगाथेचे स्मरण करून मालुसरे घराण्याचा इतिहास जपण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्पर्श केलेली कवड्यांची माळ तानाजी मालुसरे यांच्या वीरमरणानंतर त्यांच्या कुटुंबीयांना दिली होती. ही ऐतिहासिक कवड्यांची माळ आजही मालुसरे परिवाराने जतन करून ठेवली असून ती दर्शनासाठी संगमनेर येथे आणण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आई जगदंबेची महाआरती करण्यात आली तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर कानडे यांनी केले प्रस्ताविक श्री प्रसाद कानडे यांनी केले, तर आभार माऊली पठारे यांनी मानले.

# घुलेवाडी ग्रामपंचायत मतदार यादीतील बोगस नावे वगळण्याची मागणी, अन्यथा आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - घुलेवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मतदार यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या कथित बोगस मतदारांची नावे तात्काळ वगळून घरोघरी जाऊन सखोल पडताळणी करावी, अशी मागणी महायुतीच्या स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून, योग्य कारवाई न झाल्यास जनआंदोलन उभारण्याचा तसेच न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर सहकारी साखर कारखाना, अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेज यासह अनेक खाजगी संस्था घुलेवाडी परिसरात कार्यरत आहेत. या संस्थांमध्ये सध्या कार्यरत असून प्रत्यक्षात ग्रामपंचायत हद्दीत वास्तव्यास असलेल्या कर्मचारी वर्गाचीच नावे मतदार यादीत कायम ठेवावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय काही संस्थांमधील सेवा निवृत्त कर्मचारी प्रत्यक्षात येथे राहत नसतानाही त्यांची नावे मतदार यादीत कायम ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच साखर कारखाना परिसरातील 'चटई चाळ' अस्तित्वात नसताना चुकीचे घर क्रमांक दाखवून मोठ्या प्रमाणावर बोगस मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर परिणाम करणारी ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे सांगत, केवळ राजकीय स्वार्थासाठी मतदार यादीत अनधिकृत नावे समाविष्ट केल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. सर्वोच्च न्यायालय आणि केंद्रीय निवडणूक आयोग यांनी मतदार यादीच्या घरोघरी पडताळणीबाबत स्पष्ट निर्देश दिले असून, त्यानुसार घुलेवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील प्रत्येक मतदाराची प्रत्यक्ष पडताळणी करून बोगस नावे वगळावीत आणि अद्ययावत मतदार यादी तयार करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना कडक सूचना देऊन एसआयआर (डशिलळरश्र खपींशपीळींश ठर्शींळीळेप) प्रक्रियेत कोणतीही अनियमितता होऊ नये, याची खात्री करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रक्रियेदरम्यान कोणताही बोगस मतदार आढळल्यास संबंधित यंत्रणेला जबाबदार धरून जनआंदोलन उभारण्यात येईल तसेच न्यायालयीन मार्गाने कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा घुलेवाडी शिवसेना शाखाप्रमुख शरद पानसरे, भाजप तालुका उपाध्यक्ष स्वरूप राऊत, किसान मोर्चा अध्यक्ष सोमनाथ राऊत, सामाजिक कार्यकर्ते संजय पानसरे आणि युवा सेना शाखाप्रमुख ओंकार राऊत यांनी दिला आहे.

# महागाईचा महा-विस्फोट!

## एप्रिलमध्ये घाऊक महागाई ८.३० टक्क्यांवर

### ४२ महिन्यांचे रेकॉर्ड मोडले




**दैनंदिन गरजेच्या वस्तूंची (प्राथमिक वस्तू) महागाई ६.३६% वरून वाढून ९.१७% झाली**
**खाद्यपदार्थांची (अन्न निर्देशांक) महागाई १.८५% वरून वाढून १.९८% वर पोहोचली आहे.**
**इंधन आणि ऊर्जा क्षेत्रातील घाऊक महागाई दर १.०५% वरून वाढून २४.७१% झाला आहे.**
**उत्पादित वस्तूंचा घाऊक महागाई दर ३.३९% वरून वाढून ४.६२% राहिला.**

**रोजच्या गरजेच्या वस्तू, इंधन आणि विजेचे दर वाढले**

मार्चमध्ये घाऊक महागाई वाढून ८.३०% वर पोहोचली आहे. मार्चमध्ये ती ३.८८% होती. म्हणजेच, एका महिन्यात त्यात ४.४२% ची वाढ झाली आहे. एप्रिलमध्ये महागाई ४३ महिन्यांच्या उच्चांकावर होती. सप्टेंबर २०२२ मध्ये ती १०.७०% वर पोहोचली होती. वाणिज्य मंत्रालयाने आज म्हणजेच १४ मे रोजी घाऊक महागाईचे आकडे जाहीर केले आहेत. अमेरिका आणि इराणमधील वाढलेल्या तणावाच्या काळात महागाईत ही वाढ झाली आहे. हा तणाव जास्त काळ टिकल्यास महागाई आणखी वाढू शकते. एप्रिलमधील किरकोळ महागाई वाढून ३.४८% वर पोहोचली आहे. यापूर्वी मार्चमध्ये ती ३.४०% होती. महागाई वाढण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे खाण्यापिण्याच्या वस्तूंच्या किमती वाढणे. अन्नधान्याची महागाई एप्रिलमध्ये वाढून ४.२०% वर पोहोचली. मार्चमध्ये हा आकडा ३.८७% होता.

घाऊक महागाई दीर्घकाळ वाढलेली राहिल्यास बहुतेक उत्पादन क्षेत्रांवर याचा वाईट परिणाम होतो. जर घाऊक किंमती खूप जास्त काळ उच्च पातळीवर राहिल्या तर उत्पादक त्याचा भार ग्राहकांवर टाकतात. सरकार केवळ करांद्वारे थझख नियंत्रित करू शकते.

उदाहरणार्थ, कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाल्याच्या स्थितीत सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्कात कपात केली होती. तथापि, सरकार कर कपात एका मर्यादितच करू शकते. थझख मध्ये धातू, रसायने, प्लास्टिक, रबर यांसारख्या कारखान्यांशी संबंधित वस्तूंना अधिक महत्त्व दिले जाते.

महागाई कशी मोजली जाते?

- भारतात दोन प्रकारची महागाई असते. एक किरकोळ (रिटेल) आणि दुसरी घाऊक (थोक) महागाई असते. किरकोळ महागाई दर सामान्य ग्राहकांकडून दिल्या जाणाऱ्या किमतींवर आधारित असतो. याला ग्राहक किंमत निर्देशांक असेही म्हणतात. तर, घाऊक किंमत निर्देशांक (थझख) म्हणजे घाऊक बाजारात एक व्यावसायिक दुसऱ्या व्यावसायिकाकडून वसूल करत असलेल्या किमती. महागाई मोजण्यासाठी वेगवेगळ्या वस्तूंचा समावेश केला जातो. उदाहरणार्थ, घाऊक महागाईमध्ये उत्पादित वस्तूंचा वाटा ६३.७५%, अन्नधान्यासारख्या प्राथमिक वस्तूंचा २२.६२% आणि इंधन व ऊर्जा यांचा १३.१५% असतो. तर, किरकोळ महागाईमध्ये अन्न आणि उत्पादनांचा सहभाग ४५.८६%, घरांचा १०.०७% आणि इंधनासह इतर वस्तूंचाही सहभाग असतो.

**घाऊक महागाईचे ४ भाग**

**प्राथमिक वस्तू, ज्यांचे वजन २२.६२% आहे. इंधन आणि ऊर्जाचे वजन १३.१५% आणि उत्पादित वस्तूंचे वजन सर्वाधिक ६४.२३% आहे. प्राथमिक वस्तूंचे देखील चार भाग आहेत.**

- अन्नपदार्थ जसे की धान्य, गहू, भाज्या
- गैर-अन्नपदार्थांमध्ये तेलबिया येतात
- खनिजे
- कच्चे पेट्रोलियम

# हडपसर बॉम्ब प्रकरणात कारवाई

## नागपूर 'एटीएस' कडून संशयित ताब्यात



पुणे (वृत्तसंस्था)

पुण्यातील हडपसर परिसरामध्ये एका रुग्णालयाजवळ बॉम्ब ठेवल्याप्रकरणी महाराष्ट्र एटीएसने अत्यंत मोठी कारवाई केली आहे. या घटनेतील मुख्य आरोपीला एटीएसने नागपुरातून ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी हा ट्रेन क्रमांक १८०२९ शालीमार एक्सप्रेसने प्रवास करून पळून जाण्याच्या प्रयत्नात होता. या अटकेमुळे पुण्यातील बॉम्ब प्रकरणाच्या तपासाला आता एक मोठे यश आले असून आरोपीची चौकशी सुरु करण्यात आली आहे. दरम्यान, आरोपीला नागपुरात अटक केल्यानंतर आता लवकरच आरोपीला पुण्यात घेऊन येणार असल्याची माहिती आहे. त्याने पुण्यातल्या उषाकिरण हॉस्पिटलमध्ये बॉम्ब प्लांट केला होता. प्लांट करण्यामागचा उद्देश काय होता हे आता चौकशीतून समोर येईल. शिवाजी राठोड असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. रुग्णालयाच्या पार्किंग परिसरात ही बॉम्बसारखी संशयास्पद वस्तू नेमकी कोणी ठेवली होती आणि त्यामागे संबंधित व्यक्तीचा नेमका काय हेतू किंवा उद्देश असू शकतो, याचा शोध घेण्यासाठी पुणे पोलिसांनी तातडीने एक विशेष तपास मोहीम सुरू केली होती. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या सहाय्याने आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. सीसीटीव्हीमध्ये आरोपीचा चेहरा स्पष्टपणे दिसल्यानंतर त्याला पकडण्याचा मार्ग सोपा झाला होता. प्राथमिक तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांना आरोपी ट्रेनने पळून जात असल्याचा सुगावा लागला. त्यानुसार नागपूर आरपीएफच्या मदतीने शालीमार एक्सप्रेसममधून आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या. या खळबळजनक प्रकरणाचा पुढील सखोल तपास आणि आरोपीची चौकशी आता पोलीस प्रशासनाकडून केली जात आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात बुधवारी संध्याकाळी झाली जेव्हा पुण्याच्या हडपसर भागातील कामधेनू सोसायटीच्या पार्किंग एरियामध्ये एक संशयास्पद बॉम्बसारखी वस्तू आढळून आली होती. रुग्णालयाजवळ ही वस्तू सापडल्याने संपूर्ण पुणे शहरात आणि विशेषतः हडपसर परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सोसायटीच्या पार्किंग लॉटमध्ये बेवारस पडलेली ही संशयास्पद वस्तू स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आली होती. नागरिकांनी तातडीने या घटनेची माहिती स्थानिक पोलिसांना दिली, ज्यानंतर संपूर्ण सुरक्षा यंत्रणा वेगाने हलली आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
||जय श्रीराम||
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ ?
पाईल्स (PILES)
फिशर (FISSURE)
फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
7219100100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# उत्सव कला व क्रिडा अकादमीचा शनिवारी पदग्रहण समारंभ !

## संगमनेरच्या सांस्कृतिक चळवळीचे नवे पर्व सुरु

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरच्या सांस्कृतिक चळवळीला दिशा देणाऱ्या उत्सव कला व क्रिडा अकादमीचया पदग्रहण समारंभाचे शनिवार दिनांक १६ मे रोजी आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख राजेश माघाडे यांनी दिली आहे.

या पदग्रहण सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री कलाभूषण रघुवीर खेडकर उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.सुधीरजी तांबे भूषविणार आहेत. १९९० च्या दशकात संगमनेर शहरात काही होतकरू तरुणांनी मिळून उत्सव अकादमीची स्थापना केली होती. या संस्थेने आतापर्यंत बालकुमार चित्रकला स्पर्धा, राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा यशस्वीपणे आयोजित केल्या आहेत. त्याचप्रमाणे अकादमीच्या युवा कलाकारांनी संगमनेर महाविद्यालयाच्या माध्यमातून पुणे येथील अतिशय प्रतिष्ठेचा आंतरमहाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक जिंकला. 'आभास की भास' या केदार शिंदे लिखित एकांकिकेने विविध राज्यस्तरीय स्पर्धेत पारितोषिके मिळवली.

त्यानंतर रंगभूमीवर व्यावसायिक नाटकाच्या माध्यमातून युवा कलावंतांना संधी दिली. नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने विविध ठिकाणी गेलेल्या कलावंतांना पुन्हा एकत्र आणून युवा शक्तीला रचनात्मक सांस्कृतिक चळवळीकडे वळवण्यासाठी अकादमी काम करणार आहे. नव्या दमाच्या युवकांना कला व क्रिडा क्षेत्रात मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी शिक्षक-प्रशिक्षक मार्गदर्शकाची भूमिका पार पाडणार आहेत.

या कार्यक्रमासाठी उपनगराध्यक्ष नूरमोहम्मद शेख, नगरसेवक दिलीप पुंड, विश्वास मुर्तडक, किशोर टोकसे, योगेश (चिकू) जाजू, शैलेश कलंत्री, किशोर पवार, दानिश खान, नितीन अभंग, छात्र भारतीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अनिकेत घुले, संगमनेर वकील संघाच्या अध्यक्ष ड. मिनल देशमुख, ड. सुहास आहेर ड. नईम इनामदार इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम शनिवार दिनांक १६ मे रोजी सायंकाळी ६ वाजता व्यापारी असोसिशन हॉल येथे होणार असून नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन अकादमीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# जमीनीचा वाद शेतकऱ्याला मारहाण



युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव -संगमनेर तालुक्यातील माळवदवाडी (आंबीखालसा) येथे जमिनीच्या जुन्या वादातून भास्कर चिमा कडाळे (वय : ५५) या शेतकऱ्याला लाकडी दांड्याने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. १४ मे रोजी सकाळी शेतातील बांधावरील गवत पेटवल्याच्या कारणावरून हा वाद झाला. नामदेव रामभाऊ मधे आणि राजेंद्र शंकर मधे यांनी फिर्यादी कडाळे यांना शिवीगाळ करत मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी दोघांविरुद्ध घारगाव पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली.

# संसार परमात्म्याचा आनंद घेऊ देत नाही

# ह. भ. प. उमेश महाराज दशरथे

**बहु बरा बहू बरा ।**
**या सांगाते मिळो चारा ।।१।।**
**म्हणोनी जीवेसाठी ।**
**घेतली कानोबाची पाठी ।।२।।**
**बरवा बरवा दिसे ।**
**समागम यांचा निमिषे ।।३।।**
**पुढती पुढती तुका ।**
**सोंकाला सोंकविता लोका ।।४।।**



युवावार्ता (सदाशिव मुळे)

संगमनेर शहराच्या जनता नगरमध्ये सुरू असलेल्या ह.भ.प. बाळकृष्ण महाराज कर्पे यांचे नेतृत्वने ३८ वा अखंड हरिनाम सप्ताह किर्तन महोत्सव सोहळ्यात काल्याचे किर्तन करताना आळंदी येथील हभप उमेश महाराज दशरथे यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा काल्याच्या प्रकरणातील गोपी, गोपाळ कृष्णाच्या मागे का राहीले त्याचे महत्त्व विशद करणारा अभंग सेवेसाठी घेतला. देवाची संगत मिळाली की आयुष्य सुंदर होते. तोच आनंद मी सगळ्यांना वाटतो असं तुकाराम महाराज म्हणतात. अभंगावर चिंतन करताना ह.भ.प. उमेश महाराज दशरथे म्हणाले की, संसारात दु:ख प्राप्त होऊन पश्चाताप होतो. संसारातील प्रसन्नतेपेक्षा परमार्थात शाश्वत प्रसन्नता आहे. संसारात सुख थोडे व दु:ख मोठे आहे. विषयापासून मिळणारे सुख सांशन्क आहे. त्याला मर्यादा आहेत विषय व इंद्रियांचा सहयोग व्हावा लागतो परंतु त्यास मर्यादा आहे. भोग्य, भोक्ता व भोग या तीन गोष्टींचा सहयोग झाला तर सुख आहे. विषयांचा कधी न कधी विट येतो पंच विषयात स्पर्श सुख महत्त्वाचे आहे.ऐकणे स्पर्श, रूप, चांगला व अंतर या विषयांचा वीट येतो. कितीही आवडत असले तरी त्याचा वीट येतो.पाच विषय संसारात सुख व दु:ख देतात पण त्याचा वीट येतो. ज्यांनी संसार सोडला व जे भगवंताकडे गेले त्यांना सुख प्राप्त झाले. परमात्म्याच्या संगतीसाठी सर्वस्व सोडावे लागते, त्याग करावा लागतो. संसार सोडण्यासाठी तुकाराम महाराज नऊ कारणे सांगतात. संसार परमात्म्याचा आनंद घेऊ देत नाही व दुसऱ्यालाही घेऊ देत नाही त्यासाठी गोप गोपिकांनी सर्वस्व चा त्याग करून कृष्ण स्वीकारला. त्याच्या पाठीशी हे लागले, म्हणून त्यांना इतरांना न प्राप्त होणारा परमात्मा निष्काम, निस्वार्थी व प्रेमभक्ती मुळे प्राप्त झाला. दुसऱ्याच्या सुखात आपण सुख मानणे हेच खरं सुख आहे. समंजस प्रेम संसारात मिळते पण परमार्थात समर्थक प्रेम मिळते यात दुसऱ्याच्या सुखाचा विचार असतो तुमचं ज्याने मन प्रसन्न होते तेच खरे भजन आहे

.ज्ञानोबा तुकोबा या विचारला प्राधान्य देतात. देवाच्या दर्शनात समाधान आहे. अखंड हरिनाम सप्ताहमध्ये आठ दिवस श्री हरिभक्त परायण उत्तमराव गांडोळे यांनी विणा सेवा दिली. संपूर्ण हरिनाम सप्ताहाचे सूत्रसंचालन ह.भ. प. पोपट महाराज आगलावे यांनी केले. संपूर्ण सप्ताहमध्ये वारकरी संप्रदायाच्या विचाराप्रमाणेच कीर्तने पार पडले.

Happy Birthday



श्री. सतीश आहेर
संगमनेर तालुका वृत्तपत्र विक्रेता असोसिएशनचे अध्यक्ष



श्री. अतुल आहेर
इंजिनीअर, पुणे



विवेक पानसरे
संचालक, बलदेव कन्स्ट्रक्शन



शेखर पानसरे
पत्रकार

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता

# थोरात सह. साखर कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम तालुक्याचे हृदय म्हणून काम करताना सभासद शेतकरी ऊस उत्पादक यांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. ऊस हे शाश्वत पीक असल्याने कार्यक्षेत्रात शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस लागवड करावी असे आवाहन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६ - २७ या गळीत हंगामाच्या मिल रोलर प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष सौ.दुर्गाताई तांबे, व्हा. चेअरमन पांडुरंग पा. घुले, डॉ.जयश्रीताई थोरात, बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, हौशीराम सोनवणे, कारखान्याचे संचालक संपतराव गोडगे, सतीश वर्पे, विलास शिंदे, रामनाथ कुटे, विजय राहणे, गुलाबराव देशमुख,अरुण वाकचौरे, अंकुश ताजणे, मदन आंबरे, सौ. लताताई गायकर, सौ.सुंदराबाई दुबे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, किरण कानवडे, कृष्णा दिघे, आदींसह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, ऊस हे शेतकऱ्यांसाठी शाश्वत उत्पादन देणारे पीक आहे. कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त ऊस लागवड होण्यासाठी कृषी विभागाने काम केले पाहिजे याचबरोबर एकरी शंभर टन उत्पादन मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी अत्याधुनिक पद्धतीचा वापर करावा असे आवाहन करताना साखर कारखान्याची वाटचाल ही अत्यंत आदर्श तत्त्वांवर सुरू आहे. आपल्या कारखान्याने कायम चांगला भाव दिला आहे. शेतकरी, सभासद, ऊस उत्पादक, कामगार यांचे हित जोपासले आहे.

राज्यभरात अनेक सहकारी कारखान्यांमधून अल्कोहोल मधून दारूची निर्मिती केली जाते. मात्र सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श शिस्तीत आणि विचारांवर या कारखान्याचे कामकाज सुरू असून थोरात सहकारी साखर कारखान्यात दारू न बनवता इंडस्ट्रियल अल्कोहोल निर्माण केले जाते.

वीज निर्मिती आणि इथेनॉल प्रकल्प हे कारखान्याला मोठी मदत करत आहेत. चालू हंगामात कारखान्याने १ कोटी ४० लाख लिटर इथेनॉल निर्माण केले आहे. आता इथेनॉलचे महत्व जगाला कळाले आहे. युद्धामुळे जगाला आणि आपल्या देशालाही इंधनाचा तुटवडा भासत आहे. याला इथेनॉल हा महत्त्वाचा पर्यायि आहे. जास्त इथेनॉल व वीज निर्मिती करता जास्त ऊस गाळप होणे गरजेचे आहे याकरता शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस लागवड करावी असे आवाहन केले.

# गांधी-आंबेडकर चळवळींचा पाया महात्मा फुलेंनी रचला - कपिल पाटील

युवावार्ता (प्रतिनिधी)



मुंबई- गांधी आणि आंबेडकर या दोन्ही चळवळींचा पाया महात्मा फुले यांनी रचला. या देशाची स्वातंत्र्य चळवळ आणि सामाजिक न्यायाची चळवळ फुले विचारांचीच अपत्ये आहेत. गांधीजी जसे राष्ट्रपिता तसे महात्मा फुले देशाचे (भीष्म) पितामह ठरतात, असं प्रतिपादन कपिल पाटील यांच्या निबंध पुस्तिकेत करण्यात आलं आहे.

ज्येष्ठ नाटककार, पत्रकार ज्ञानेश महाराव, ज्येष्ठ साहित्यिका आशालता कांबळे, पत्रकार मृणालिनी नानिवडेकर, वंचितच्या नेत्या उत्कर्षा रूपवते आणि राष्ट्र सेवा दलाचे राज्य अध्यक्ष राजा कांदळकर यांच्या हस्ते या पुस्तिकेचं प्रकाशन झाले.

महात्मा जोतीराव फुले यांना 'महात्मा' हा किताब मुंबईकर जनतेने ११ मे १८८८ रोजी दिला होता. त्याचं निमित्त साधत ११ मे २०२६ रोजी प्रभादेवीच्या पु. ल. देशपांडे अकादमीत 'धन्य जोतीबा' हा श्रीनाथ म्हात्रे आणि सहकारी यांचा सांगीतिक कार्यक्रम पार पडला.

राष्ट्र पितामह महात्मा जोतीराव फुले जन्म द्विशताब्दी महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, अभ्यासक, कार्यकर्ते आणि सत्यशोधक चळवळीतील नेत्यांचे आताच्या पिढीतील वंशज आवर्जून उपस्थित होते. मुंबई देशस्थ मराठा ज्ञाती धर्म संस्था, माळी मिशन, संत शिरोमणी सावता माळी मंडळ, कित्ते - भंडारी मंडळ, सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाज, तसेच कुणबी, आगरी, कोळी, नाभीक, परीट, पद्मशाली तेलगू समाज यांचे प्रतिनिधी तसेच राज्य सरकारी कर्मचारी संघटना, हिंद मजदूर किसान पंचायत, मुंबई लेबर युनियन, दी म्युनिसपल युनियन, सफाई कामगार, माथाडी कामगार, शिक्षक भारती या संघटनांच्या नेत्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

फुलेंचा अखंड गात समितीचे निमंत्रक ज्ञानेश महाराव म्हणाले, जात-पात, अंधश्रद्धा आणि विषमतेच्या पलीकडे जाऊन स्वतंत्र विचारांची समाजरचना उभी करणे, हीच फुले विचारांची खरी दिशा.

यावेळी बोलताना समितीचे निमंत्रक कपिल पाटील यांनी सांगितलं, स्वातंत्र्य चळवळीचं नि:संशय नेतृत्व महात्मा गांधींनी केलं. गांधी स्वत: फुलेंना महात्म्यांचे महात्मा म्हणतात. पण लोकमान्य टिळक, ॲनी बेझंट आणि काँग्रेस यांनी स्वराज्याची मागणी करण्याआधी महात्मा फुलेंनी स्वातंत्र्यांची गरज प्रतिपादत, ते खेचून घ्यावं लागेल हे सर्वप्रथम सांगितलं. देशातील सामाजिक क्रांतीची आणि स्त्री मुक्तीची ज्योतही फुलेंनीच पेटवली. म्हणून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना बुद्ध, कबीरांच्या सोबत गुरु मानत होते. कार्यक्रमाचे संयोजन राजा कांदळकर, रोहित ढाले आणि श्रीनाथ म्हात्रे यांनी केले. विश्वास काटकर, सुभाष मळगी, सुरेश ठाकुर, संजीव पुजारी, रमाकांत बने, अरुण रांजणे, दीपक भालेराव हे कामगार नेते आणि भालचंद्र नलावडे, मारूती कुदळे, मलविंदरसिंग खुराना, जयवंत पाटील, सच्चिदानंद शेट्टी, हाजी जतकर, राजहंस टपके, ताप्ती मुखोपाध्याय, अशोक बेलसरे, सुभाष मोरे, कैलास गौड, देवीदास हटकर, राजू जांगळे, फरीद खान राजश्री भानजी, वर्षा कांबळे, कल्पना शेंडे, नंदा कांबळे, गोपीनाथ लोखंडे, मोनिका काळे, सागर भालेराव हे समाज नेते यावेळी उपस्थित होते. समितीच्या 'धन्य जोतीबा' हा कार्यक्रम राज्यभर नेण्यात येईल, असे ढाले यांनी सांगितले.

# भावपूर्ण श्रद्धांजली

## उषादेवी जगदाळे पाटील



पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. वीरधवल जगदाळे पाटील यांच्या मातोश्री तथा आमच्या आप्तेष्ट आणि दौंड तालुक्याच्या माजी आमदार श्रीमती उषादेवी कृष्णराव जगदाळे पाटील यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दु:खद आहे.

दौंडचे माजी आमदार स्वर्गीय कृष्णराव (बाळासाहेब) जगदाळे पाटील यांच्या सामाजिक व राजकीय कार्यात खंबीरपणे सहभागी होत त्यांनी जनसेवेचा आदर्श निर्माण केला. दौंड नगरपरिषदेच्या पहिल्या लोकनियुक्त नगराध्यक्षा तसेच दौंड तालुक्याच्या पहिल्या महिला आमदार म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. सन १९७२-७७ आणि १९८०-८५ या कालखंडात त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या प्रश्नांना न्याय देत विकासाभिमुख नेतृत्व केले. जनतेशी जिव्हाळ्याचे नाते जपत सर्वांना आपलेसे मानणाऱ्या नेत्या म्हणून त्या कायम स्मरणात राहतील. आमच्या तांबे परिवारावरही त्यांचे विशेष प्रेम व आत्मीयता होती. त्यांच्या निधनाने सामाजिक व राजकीय क्षेत्रातील एक संवेदनशील, दिलखुलास आणि जनतेची मनापासून काळजी घेणारे व्यक्तिमत्त्व हरपले आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व जगदाळे परिवाराला या दु:खातून सावरण्याची शक्ती प्रदान करो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

भावपूर्ण श्रद्धांजली!

**मा. नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, संगमनेर**

# मोदींच्या नेतृत्वामुळे देशाला आर्थिक स्थर्य - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - पाठीमागील काही महिन्यांपासून जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या तणावपूर्ण आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक देशांसमोर विविध संकटे उभी ठाकली आहेत. मात्र, अशा कठीण काळात माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या कणखर आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे भारतापर्यंत त्याची तीव्र झळ पोहोचू शकली नाही. त्यांच्या सक्षम कार्यशैलीमुळे देशाची आर्थिक स्थिरता अबाधित राहिली आहे. याच पार्श्वभूमीवर परकीय चलन देशातच टिकून राहावे आणि भारत आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व्हावा, यासाठी पंतप्रधान मोदीजींनी केलेल्या आवाहनाला देशभरातून उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. आज गरज आहे ती आपल्या देशासोबत ठामपणे उभे राहण्याची. त्यामुळे आपण सर्व मिळून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊया असे आवाहन आ. अमोल खताळ यांनी नागरीकांना केले आहे.

# संपादकीय...

## ब्लू इकॉनॉमी महासागराधारित उद्योगांचे भविष्य

ब्लू इकॉनॉमी म्हणजे सामाजिक-आर्थिक विकास, हवामान लवचिकता आणि परिसंस्थेतील संतुलन राखण्यासाठी महासागरी संसाधनांचा शाश्वत वापर होय. संयुक्त राष्ट्र व्यापार आणि विकास संस्थेच्या २०२३ च्या अंदाजानुसार महासागर जागतिक अर्थव्यवस्थेला दरवर्षी सुमारे यूएस २.२ ट्रिलियनचे योगदान देतात आणि २०३० पर्यंत हे योगदान यूएस ३ ट्रिलियनपेक्षा अधिक होण्याची तसेच सुमारे ४० दशलक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. या वाढत्या क्षेत्रात स्टार्टअप्स आणि नाविन्यपूर्ण उद्योजकीय उपक्रमांना महत्त्वाची भूमिका मिळत आहे. ब्लू इकॉनॉमी स्टार्टअप्स पारंपरिक शोषणवादी मॉडेलमधून बाहेर पडून नवोन्मेष आणि मूल्यवर्धनावर आधारित अर्थव्यवस्थेकडे संक्रमण घडवत आहेत. सागरी जैवउत्पादने, जैवइंधने, जैवऔषधे, सागरी नूतनीकरणीय ऊर्जा आणि शाश्वत मत्स्यपालन यांसारख्या क्षेत्रांमध्ये हे स्टार्टअप्स वेगाने विस्तारत आहेत. स्वीडनमधील इको वेव्ह पॉवर महासागरातील लाटांपासून ऊर्जा निर्माण करते, तर नॉर्वेमधील ब्ल्यूआय रोबोटिक्स पाण्याखालील निरीक्षणासाठी रोबोटिक्स विकसित करते. आफ्रिकेतील झांझीबारमध्ये समुद्री शैवाल शेतीत मोठ्या प्रमाणावर महिलांचा सहभाग दिसतो. जागतिक स्तरावर समुद्री शैवाल बाजार २०२१ मध्ये सुमारे यूएस १७ अब्जांपर्यंत पोहोचला असून अन्न, जैवइंधन, सौंदर्यप्रसाधने आणि जैवप्लास्टिक उद्योगांमध्ये त्याचा वापर वाढत आहे. ब्लू इकॉनॉमी आता परिपत्र अर्थव्यवस्था आणि सूक्ष्म उद्योग मॉडेल्सकडेही वळत आहे, ज्यातून किनारी उपजीविका, कार्बन शोषण आणि मूल्यवर्धनाच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. तथापि, शाश्वतता आणि नियामक व्यवस्थापन हे भविष्यातील महत्त्वाचे आव्हान ठरणार आहे. भारताच्या संदर्भात ब्लू इकॉनॉमी ऋउझ मध्ये सुमारे ४ टक्के योगदान देते, तर महासागर तंत्रज्ञान बाजाराची किंमत सुमारे यूएस १३.२ अब्ज आहे. तरीही स्टार्टअप परिसंस्था अजून प्रारंभिक अवस्थेत आहे. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना, सागरमाला कार्यक्रम, डीप ओशन मिशन आणि स्टार्टअप इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे या क्षेत्राला बळ मिळत आहे. महाराष्ट्रात समुद्री शैवाल शेतीमुळे किनारी उत्पन्नात वाढ झाली असून महिला स्वयं सहाय्य गटांचा सहभागही वाढला आहे. ब्लू इकॉनॉमीमध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. जागतिक मत्स्य आणि मत्स्यपालन क्षेत्रात महिलांचा वाटा सुमारे २१ टक्के आहे, तर लघु मत्स्य व्यवसायात हा वाटा ४७ टक्क्यांपर्यंत पोहोचतो. मूल्यसाखळीतील कापणीनंतरच्या प्रक्रियांमध्ये महिलांचा सहभाग अधिक आहे. काही जागतिक स्टार्टअप्स आणि भारतातील स्थानिक उपक्रमांमुळे महिलांना उद्योजकतेच्या संधी मिळत आहेत. महिला नेतृत्वामुळे शाश्वत संसाधन व्यवस्थापन आणि आर्थिक स्थैर्य अधिक मजबूत होत आहे. तथापि, या क्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत. मर्यादित वित्तपुरवठा, कौशल्याची कमतरता, बाजारपेठेतील प्रवेश मर्यादा, डेटा अभाव आणि पायाभूत सुविधांची कमतरता ही प्रमुख अडचणी आहेत. विशेषतः महिला उद्योजकांना वित्तीय अडथळे अधिक प्रमाणात भेडसावतात. त्यामुळे सामाजिक संरक्षण आणि धोरणात्मक आधार आवश्यक ठरतो. या समस्यांवर उपाय म्हणून लक्ष्यित वित्तपुरवठा, मिश्रित वित्तीय यंत्रणा आणि आंतरराष्ट्रीय निधी उपक्रम महत्त्वाचे ठरतात. तसेच प्रशिक्षण, डिजिटल कौशल्य विकास, हवामानस्मार्ट तंत्रज्ञान आणि उद्योजकीय शिक्षण यांचा प्रसार करणे गरजेचे आहे. इंडोनेशिया आणि तामिळनाडूमधील उपक्रम याचे उदाहरण आहेत, जिथे स्थानिक समुदायांना शाश्वत मत्स्यपालन आणि प्रक्रिया उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते. समावेशक प्रशासन आणि डेटा-आधारित धोरणनिर्मितीही तितकीच आवश्यक आहे. लिंगाधारित आणि क्षेत्रनिहाय डेटा संकलनामुळे धोरणे अधिक प्रभावी होऊ शकतात. फिजी आणि केरळमधील मॉडेल्स दाखवतात की स्थानिक पातळीवर महिला सहभाग वाढविल्यास व्यवस्थापन आणि उपजीविका सुधारते. तसेच जागतिक बाजारपेठांपर्यंत प्रवेश, प्रमाणपत्रे आणि ब्रँडिंग यामुळे स्टार्टअप्सना अधिक संधी मिळू शकतात.

## भारतीय सशस्त्र दलातील अधिकारी पदांच्या पूर्व प्रशिक्षणाचा इच्छुकांनी लाभ घ्यावा : सैनिक कल्याण विभाग



अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)- भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे नवयुवक - नवयुवतींसाठी दि. १५ जून ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ६७ चे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासोबतच मोफत निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहिल्यानगर येथे दिनांक ०८ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता उपस्थित राहावे. उमेदवारांनी सैनिक कल्याण विभागाच्या (डीएसडब्ल्यू) अधिकृत संकेतस्थळावरून अर्जाचा नमुना व प्रवेशपत्र डाउनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

या प्रशिक्षणासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक असून, संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या सी.डी.एस. परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज केलेला असावा. याबाबत अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्याशी training.pctcnashikgmail.com या ई-मेलवर किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ तसेच व्हॉट्सप क्रमांक ९१५६०७३३०६ वर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## सिद्धार्थ नाईट हायस्कूल दहावी परीक्षेत जिल्ह्यात अव्वल




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - बहुजन शिक्षण संघ संस्थेचे सिद्धार्थ नाईट हायस्कूल, दादासाहेब रूपवते शिक्षण संकुल, तहसील कार्यालयाजवळ, संगमनेर येथील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ चा निकाल ८३.३३ टक्के लागला आहे. हा निकाल संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील रात्र शाळांमध्ये अव्वल ठरला असून विद्यालयाच्या इतिहासातील उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत शाळेची गुणवत्तापूर्ण परंपरा कायम राखली आहे.

गुणवत्तेनुसार प्रथम क्रमांक खंडागळे सोनाली माणिक हिने ३४९ गुण (६९.८० टक्के) मिळवत पटकावला. द्वितीय क्रमांक उज्वला लक्ष्मण रहाणे हिने ३०८ गुण (६१.६० टक्के), तर तृतीय क्रमांक कांबळे राधिका रामदास हिने २९१ गुण (५८.२० टक्के) मिळवला. जाधव पूनम अरविंद हिने २५३ गुण (५०.६० टक्के) मिळवत चौथा क्रमांक, तर कुरेशी फरीन शाहिद हिने २५१ गुण (५०.२० टक्के) मिळवत पाचवा क्रमांक पटकावला.

रात्र शाळा ही संकल्पना क्रांतीसूर्य महात्मा फुले यांनी १८५५ मध्ये समाजातील वंचित, मागास घटक, कामगार व मजूर यांच्यासाठी सुरू केली होती. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही मुंबईतील रात्र शाळेत अध्यापनाचे कार्य केले. त्यांच्या प्रेरणेतून माजी मंत्री दादासाहेब रूपवते यांनी १९७० मध्ये संगमनेर येथे बहुजन शिक्षण संघ संस्थेचे सिद्धार्थ नाईट हायस्कूल सुरू केले, जे आज वटवृक्षासारखे विस्तारले आहे.आजच्या काळातही बांधकाम कामगार, हॉटेल कामगार, कापड दुकानातील कर्मचारी, छोटे उद्योगधंदे करणारे, चतुर्थश्रेणी कर्मचारी, रिक्षा-टेम्पो चालक तसेच महिला अशा अनेक घटकांसाठी रात्र शाळा महत्त्वाची ठरत आहे. दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठ्या जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण करत आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता आठवी, नववी व दहावीचे प्रवेश सुरू झाले असून कोणतीही वयोमर्यादा नाही. विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व स्टेशनरी उपलब्ध करून दिली जाते. तसेच आरटीई अंतर्गत कमी शिक्षण असलेल्या विद्यार्थ्यांना थेट आठवीत प्रवेश दिला जातो, अशी माहिती मुख्याध्यापक विकास जगताप यांनी दिली.

या यशाबद्दल बहुजन शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्त, तसेच विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मासूम सामाजिक संस्थेनेही या यशात मोलाची भूमिका बजावल्याचे सांगण्यात आले. मुख्याध्यापक विकास जगताप यांनी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याचे सांगून सर्वांचे अभिनंदन केले आहे.

### ग्रामपंचायत वडझरी खुर्द, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

सरपंच/ ग्रामविकास अधिकारी ग्रा. पं. वडझरी खुर्द, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर हे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदाराकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामांच्या निविदा मागवीत आहेत. निविदेचा कोरा नमुना व भरलेली निविदा स्विकारण्याचा कालावधी दिनांक. १६/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजले पासुन दि. २२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय वडझरी खुर्द या ठिकाणी उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजना | अंदाजीत रक्कम | बयाना रक्कम रुपये | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे वडझरी खुर्द येथे पाणी पुरवठा योजना विहिरीवर १५ एचपी विद्युत पंप, स्टार्टर, वायरसह बसविणे | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | १५००००/- | १% | खुला |

१) उपरोक्त कामाच्या निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केलेला असुन निविदा संच दि. १६/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पासुन दि. २२/०५/२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय रोखीने अथवा धनाकर्षाने भरणा करुन उपलब्ध आहे.
२)निविदा ग्रा.पं. कार्यालय दि. २२/०५/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा. ग्राम. कार्यालय उघडण्यात येतील.
४)निविदा संदर्भात सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्या. पहावयास मिळेल.
५) निविदा अटी व शर्ती मध्ये बदल करणे प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरित राखुन ठेवला आहे.

ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडझरी खुर्द, ता. संगमनेर, जि. अ.नगर
सरपंच, ग्रामपंचायत, वडझरी खुर्द, ता. संगमनेर, जि. अ.नगर

### धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

### जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**त्वरित पाहिजेत**
पेट्रोल पंप वर २ कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक उमेदवारांनी संपर्क करावा
पत्ता - चैतन्य पेट्रोलियम, संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी
8888808397

**पाहिजेत**
पुरुष रिसेप्शनिस्ट
अनुभवास प्राधान्य, बँकिंग व्यवहाराचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान व स्वतःची दुचाकी व लायसन्स आवश्यक
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**पाहिजेत**
पसायदान चिल्ड्रन क्लिनिक अँण्ड नर्सिंग होम
ताजणे मळा, नविन नगर रोड, संगमनेर
डॉक्टर – BAMS / BHMS (सकाळ–१, रात्री –१)
नर्स – ANM / GNM (सकाळी –१, दुपारी–१, रात्री –२)
लॅब टेक्निशिअन (सकाळी –१, रात्री –१)
९९६०६१०६२३

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**गाळे भाडेतत्वावर देणे आहे**
शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
पत्ता – नाशिक–पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

**त्वरित पाहिजेत**
ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व साईट व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
9421911671

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

### ग्रामपंचायत पळसुंदे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर, खुली निविदा नोटीस

ग्रामपंचायत ग्रामपंचायत पळसुंदे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचेमार्फत योग्य त्या जिल्हा परिषद ठेकेदार अंतर्गत नोंदणीकृत मक्तेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या निविदा / दरपत्रक मागवित आहेत. निविदेचा कोरा नमुना व भरलेली निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि.१६/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून ते दि. २०/०५/२०२६ सायंकाळी कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच शासकिय सुट्टी वगळून व कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत २१/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा नंतर निविदा उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजना | प्रशासकीय रक्कम | बयाणा रक्कम | काम पुर्ण करण्याची मुदत | कोऱ्या निविदा संचाची किंमत | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे फोफसंडी येथे पंपहाऊस दुरुस्त करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२२-२३ | २३२०४७/- | २३२०/- | तीन महिने | १००/- | सु.बे. |
| २ | मौजे पळसुंदे येथे रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५ | १९३०८२/- | १९३०/- | तीन महिने | १००/- | सु.बे. |
| ३ | मौजे घोडेवाडी येथे स्मशानभूमी बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २०२३-२४ | २८८८९७/- | २८८८/- | तीन महिने | १००/- | सु.बे. |

अटी व शर्ती - १) सदर काम पूर्ण करणेच कालावधी ३ महिने राहील २) निविदा / दरपत्रक या तांत्रिक लिफाफा व्यापारी लिफाफा या दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. ३) निविदा / दरपत्रक अटि व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदा मधिल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीने ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत. ४) लिफाफा क्र १ शक्यतो निविदेमधील नमूद कालावधी व वेळेत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येईल. सदर निविदा उघडताना मक्तेदार उपस्थित नसले तरीही नियोजित वेळेत निविदा उघडण्यात येतील.


ग्रामपंचायत अधिकारी, ग्रा.पं. पळसुंदे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
सरपंच, ग्रा.पं. पळसुंदे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**अंक वितरणासाठी मुले पाहिजेत**
9822039460
7620388230

युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२




टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची







दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# प्रा. डॉ. मंडलिक यांची पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेच्या अधिष्ठातापदी निवड

अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-
तालुक्यातील उंचखडक येथील व अगस्ति महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. धनंजय मंडलिक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेच्या अधिष्ठाता (डीन) पदी निवड करण्यात आली आहे.



डॉ. धनंजय मंडलिक यांनी शैक्षणिक क्षेत्रातील दीर्घ अनुभव, अभ्यासू वृत्ती आणि विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोन यामुळे त्यांनी शिक्षण क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या निवडीमुळे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेला नवी दिशा आणि बळ मिळेल, असा विश्वास शिक्षण तज्ज्ञाकडून व्यक्त केला जात आहे.

प्राथमिक शिक्षण उंचखडक बु. ता. अकोले जिल्हा परिषद शाळा. वडील अशिक्षित, शेती करणारे. अगस्ति महाविद्यालय, अकोले येथे बी.एस्सी. फिजिक्स विषयात पदवी संपादित केली. नंतर त्यांनी नाशिक येथे एम.सी.एम. पूर्ण केले. त्यांनी शिरूर येथे रसिकलाल धरिवाल कॉलेजमध्ये ५ वर्ष प्राध्यापक म्हणून काम केले व आता ते सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये कार्यरत आहेत.

डॉ. मंडलिक यांनी यापूर्वी विविध शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या असून, संशोधन, गुणवत्ता वृद्धी आणि आधुनिक शिक्षणपद्धती यावर त्यांनी सातत्याने भर दिला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल अहिल्यानगर, नाशिक, पुणे विभागातील विविध संस्था, प्राध्यापक, विद्यार्थी व अकोले तालुक्यातील तसेच उंचखडक परिसरातील सर्व ग्रामस्थ, मान्यवरांनी पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत त्यांचे अभिनंदन केले.

शैक्षणिक क्षेत्रातील या निवडीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली असून, ग्रामीण भागातून आलेले विद्यार्थीही उच्च पदांवर पोहोचू शकतात हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. अशा निवडींमुळे ग्रामीण शिक्षणव्यवस्थेला नवी दिशा मिळत असून, शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता वाढीस चालना मिळत आहे.

# वारकऱ्यांसाठी मूलभूत सुविधांचे काटेकोर नियोजन करा : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-
पांडुरंगाच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह परजिल्ह्यातील अनेक दिंड्या आषाढी वारीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या दिंड्यांतील वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी, वीजपुरवठा, मुक्कामाची व्यवस्था, फिरती स्वच्छतागृहे, आरोग्य सुविधा तसेच सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आषाढी वारी - २०२६ नियोजनाबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ, संत निळोबाराय पालखीचे अध्यक्ष अशोकराव सावंत, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग, देवीदास महाराज म्हस्के, मानाच्या पालख्यांचे प्रमुख, विविध दिंडी प्रमुख तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. हजारो वारकरी पायी प्रवास करत असतात. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेसह सर्व मूलभूत सुविधांची प्रभावी व्यवस्था करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. ज्या गावांमध्ये अथवा शहरांमध्ये दिंड्यांचा मुक्काम होणार आहे, त्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले. दिंडी मार्गावर वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, निवास व्यवस्था आणि वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक प्रशासनाने समन्वयाने कार्य करावे, तसेच मुक्कामाच्या ठिकाणी वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात यावेत. आवश्यकतेनुसार जिल्हा परिषदेच्या शाळांमधील खोल्याही उपलब्ध करून देण्यात याव्यात, असेही त्यांनी नमूद केले.

वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक औषधसाठा, मनुष्यबळ आणि रुग्णवाहिका उपलब्ध ठेवून आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपचार मिळतील, याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच दिंडीदरम्यान पुरविण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता नियमित तपासण्याबरोबरच मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक इंधन व्यवस्थाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. शासनाने इंधनाचा कमीत कमी वापर करण्याबाबत निर्देश दिले असून, सर्व विभागांनी त्याचे काटेकोर पालन करून इंधन बचतीसाठी सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी केले. आषाढी वारीदरम्यान प्रभावी समन्वय राखण्यासाठी सर्व विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांची संपर्क सूची तयार करण्यात यावी. संबंधित अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक नमूद करून तातडीच्या समन्वयासाठी व्हॉट्सप समूह तयार करावा. तसेच जिल्हा आणि तालुका स्तरावर हेल्पलाईन क्रमांक सुरू करून त्याची माहिती प्रत्येक दिंडीपर्यंत पोहोचवावी, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

# पीक प्रात्यक्षिक व बियाणे वितरण योजनांसाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावेत : कृषी विभागाचे आवाहन

अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-
राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियान - अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिके तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया अंतर्गत खरीप हंगाम २०२६ - २७ मध्ये कडधान्य, पौष्टिक तृणधान्य, भरडधान्य आदी पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पीक प्रात्यक्षिक, प्रमाणित बियाणे वितरण तसेच मिनिकिट वितरण या घटकांचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी व शेतकरी गटांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.



या योजनांचा लाभ घेण्यासाठी शासनामार्फत ३१ मार्च २०२७ पूर्वी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांना अर्ज करता येणार आहेत. लाभार्थ्यांची निवड प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येणार असून, संबंधित गटांच्या अधिकृत सदस्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे.

महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावर पीक प्रात्यक्षिक, प्रमाणित बियाणे वितरण तसेच कडधान्य पिकांचे मिनिकिट वितरण या घटकांसाठी शेतकरी व शेतकरी गट अर्ज करू शकतात. शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांकडे तसेच लाभ घेणाऱ्या गटातील सदस्यांकडे फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेने सन २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले असल्यामुळे या योजनांमध्ये महिला शेतकऱ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे महिला शेतकरी खातेदारांनी जास्तीत जास्त अर्ज सादर करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे. संबंधित घटकांतर्गत यापूर्वी लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना पुढील दोन वर्षे लाभ देण्यात येणार नाही. योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# ‘उजेडाच्या वाटा’ पुस्तकाला अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचा राज्यस्तरीय पुरस्कार

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-
संदीप वाकचौरे यांनी लिहिलेल्या ‘उजेडाच्या वाटा’ या पुस्तकाला अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ यांच्या २०२५ सालच्या उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कारांमध्ये ‘ललितेतर विभागात द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार’ जाहीर झाला आहे. हे पुस्तक चपराक प्रकाशन यांच्यावतीने प्रकाशित करण्यात आले आहे. अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे २०२५ मध्ये प्रकाशित झालेल्या विविध साहित्यप्रकारांतील पुस्तकांसाठी उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार जाहीर करण्यात आले. हे पुरस्कार संबंधित पुस्तकांच्या प्रकाशकांना प्रदान करण्यात येणार आहेत.




ललित विभागात ‘असो!’ या पुस्तकाला प्रथम पुरस्कार मिळाला असून, तो ग्रंथाली यांना जाहीर झाला आहे. ‘कर्णपुत्र आणि अस्त्र’ या पुस्तकाला द्वितीय पुरस्कार मिळाला असून, तो मायमिरर पब्लिशिंग हाऊस यांना जाहीर करण्यात आला आहे. ‘शिवचरित्र’ या पुस्तकाला उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला असून, तो साकेत प्रकाशन प्रा. लि. यांना जाहीर झाला आहे. ललितेतर विभागात ‘कर्मवीर भाऊराव पाटील यांची शिक्षणविषयक पत्रे : एक आकलन’ या पुस्तकाला प्रथम पुरस्कार मिळाला असून, तो सकाळ प्रकाशन यांना जाहीर झाला आहे. द्वितीय पुरस्कार ‘उजेडाच्या वाटा’ या पुस्तकाला मिळाला असून, उत्तेजनार्थ पुरस्कार ‘काव्यभान’ या पुस्तकासाठी अष्टगंध प्रकाशन यांना जाहीर झाला आहे.

संदर्भ ग्रंथ विभागात ‘बृहत् गीता शास्त्र खंड १ व २’ या पुस्तकाला प्रथम पुरस्कार, तर ‘ग्लोबल साहित्य सफर भाग १ व २’ या पुस्तकाला द्वितीय पुरस्कार जाहीर झाला आहे. विज्ञानविषयक विभागात ‘खगोलशास्त्रातील नोबेल पारितोषिके’ या पुस्तकाला प्रथम पुरस्कार मिळाला असून, ‘सायबर गुन्हेगारी आणि स्व-संरक्षण’ या पुस्तकाला उत्तेजनार्थ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

बालसाहित्य, शिशुसाहित्य, कुमार साहित्य, अनुवाद, मुखपृष्ठ, जाहिरात व ग्रंथप्रचार साहित्य, ग्रामीण व निमशहरी साहित्य, अशा विविध विभागांमध्येही अनेक पुस्तकांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. यावर्षीच्या परीक्षकांमध्ये डॉ. संदीप सांगळे, संदीप देशपांडे आणि कुमार बोत्रे यांचा समावेश होता. पुरस्कार वितरण समारंभ शनिवार, दि. ३० मे रोजी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स येथे सायंकाळी संपन्न होणार आहे.

# पेट्रोल-डिझेलच्या किमती आणखी भडकणार ?

मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षामुळे जागतिक अर्थकारण, ऊर्जा सुरक्षाव्यवस्था आणि सामरिक संतुलन पुन्हा एकदा गंभीर संकटात सापडले आहे. गेल्या काही दशकांपासून होर्मुझ सामुद्रधुनी ही केवळ समुद्री मार्ग नसून जागतिक ऊर्जा पुरवठ्याची जीवनवाहिनी मानली जाते. जगातील मोठ्या प्रमाणातील कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू या सामुद्रधुनीतून जगभर पोहोचते. त्यामुळे या भागात निर्माण होणारा कोणताही संघर्ष थेट जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम करतो. सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या प्रदीर्घ संघर्षामुळे परिस्थिती अधिक धोकादायक बनली आहे. विशेषतः आशियाई राष्ट्रांसाठी हे संकट अधिक गंभीर आहे, कारण ऊर्जा आयातीसाठी ही देशे मोठ्या प्रमाणावर मध्यपूर्वेवर अवलंबून आहेत.

अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या अणुस्थळांवर केलेल्या कारवायांनंतर परिस्थिती अधिक चिघळली. २०२६ मध्ये हा संघर्ष केवळ अणुस्थळांपुरता मर्यादित न राहता इराणच्या व्यापक लष्करी क्षमतांवर केंद्रित झाला. यामुळे इराणनेही आक्रमक भूमिका घेत होर्मुझ सामुद्रधुनीत सागरी नाकेबंदीचा मार्ग स्वीकारला. परिणामी, जागतिक तेलपुरवठा विस्कळीत झाला आणि ऊर्जा बाजारात प्रचंड अस्थिरता निर्माण झाली. इराणने पूर्वीपासूनच स्पष्ट केले होते की, त्यांच्या सार्वभौमत्वावर किंवा राजकीय अस्तित्वावर गंभीर धोका निर्माण झाल्यास ते संपूर्ण प्रदेश अस्थिर करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत. आज ते वास्तव प्रत्यक्षात दिसून येत आहे.

या संघर्षाचा सर्वाधिक परिणाम आशियाई अर्थव्यवस्थांवर होत आहे. जपान, भारत, दक्षिण कोरिया आणि चीन यांसारखी राष्ट्रे मोठ्या प्रमाणावर मध्यपूर्वेतील तेल आणि वायूवर अवलंबून आहेत. ऊर्जा पुरवठा खंडित झाल्यास या देशांच्या औद्योगिक, आर्थिक आणि वाहतूक व्यवस्थांवर थेट परिणाम होऊ शकतो. जपानने आपल्या रणनीतिक तेलसाठ्याचा वापर सुरू केल्याच्या बातम्या हेच दर्शवतात की परिस्थिती किती गंभीर आहे. युद्धविराम टिकल्यास




होर्मुझ सामुद्रधुनी सुरक्षित करण्यासाठी माईनस्वीपिंग ऑपरेशन्स वाढवण्याचाही टोकियो विचार करत आहे.

चीनची भूमिका या संघर्षात अत्यंत महत्त्वाची आहे. बीजिंग हा इराणी कच्च्या तेलाचा सर्वात मोठा ग्राहक राहिला आहे. निर्बंधांमुळे इतर राष्ट्रांनी इराणपासून अंतर राखले असताना चीनने सवलतीच्या दरात मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी केले. मात्र सध्याच्या संघर्षामुळे चीनसमोरही कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे. एका बाजूला इराणचा पूर्णपणे पतन होऊ नये, हे बीजिंगसाठी आवश्यक आहे, तर दुसऱ्या बाजूला सौदी अरेबिया आणि आखाती राष्ट्रांशी असलेले आर्थिक संबंध टिकवणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे चीनला संतुलित भूमिका घ्यावी लागत आहे.

भारतासाठीही हे संकट कमी धोकादायक नाही. भारताची ऊर्जा गरज मोठ्या प्रमाणावर मध्यपूर्वेवर अवलंबून आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतील अस्थिरता भारतीय अर्थव्यवस्थेसाठी महागाई, इंधनदरवाढ आणि पुरवठा साखळी विस्कळीत होण्याचे कारण ठरू शकते. यापूर्वीही इराणने आर्थिक आणि राजकीय दबाव निर्माण करण्यासाठी जहाज जप्ती, तेलदेयके रोखणे आणि विविध दबावतंत्रांचा वापर केला आहे. भारताने अमेरिकन निर्बंधांचे पालन करताना इराणबरोबरचे आर्थिक व्यवहार मर्यादित ठेवले होते. त्यामुळे नवी दिल्ली आणि तेहरान यांच्यातील संबंधांमध्ये काही प्रमाणात तणाव निर्माण झाला होता. आजही या पार्श्वभूमीचा परिणाम दिसून येतो.

आशियाई राष्ट्रांसाठी सर्वात मोठे आव्हान म्हणजे एकसंध भूमिका तयार करण्यात येणारे अपयश. समान आर्थिक हितसंबंध असूनही आशियाई देशांमध्ये व्यापक सामरिक एकमत दिसत नाही. जपान आणि भारत हे इंडो-पॅसिफिकमधील क्वॉड समूहाचे भागीदार असले, तरी होर्मुझ संकटावर एकत्रित धोरण तयार करण्यात मर्यादा स्पष्टपणे दिसतात. चीन-भारत स्पर्धा हे यामागील एक प्रमुख कारण आहे. बीजिंगची आशियातील वर्चस्ववादी भूमिका आणि भारताचे स्वतंत्र रणनीतिक हित यांच्यात मूलभूत संघर्ष आहे. २०२० मधील सीमावादानंतर भारताने अमेरिका, युरोप आणि ऑस्ट्रेलियाशी आपले संबंध अधिक मजबूत केले. परिणामी, आशियाई सहकार्याची कल्पना प्रत्यक्षात आणणे अधिक कठीण झाले आहे.

या संपूर्ण परिस्थितीत अमेरिकेची भूमिका अजूनही निर्णायक राहते. अनेकजण अमेरिकेची जागतिक ताकद कमी होत असल्याचे सांगतात; मात्र वास्तव वेगळे आहे. मध्यपूर्वेतील सुरक्षाव्यवस्थेत अमेरिकेची उपस्थिती आजही प्रभावी आहे. अमेरिकन नौदल आणि लष्करी यंत्रणा या प्रदेशात सक्रिय असल्याने आशियाई राष्ट्रांना काही प्रमाणात दिलासा मिळतो. परंतु दीर्घकालीन दृष्टीने आशियाई देशांनी केवळ अमेरिकेवर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते. ऊर्जा सुरक्षेसाठी स्वतंत्र आणि समन्वित प्रादेशिक धोरण विकसित करण्याची गरज आता अधिक तीव्र झाली आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीतील संकटाने आशियासमोर एक मूलभूत प्रश्न उभा केला आहे. आर्थिकदृष्ट्या परस्परावलंबी असलेली राष्ट्रे सामरिकदृष्ट्या एकत्र येऊ शकतील का? ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न केवळ तेलपुरवठ्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. तो आता राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण आणि जागतिक सत्तासंतुलनाशी जोडला गेला आहे. त्यामुळे आशियाई राष्ट्रांनी परस्पर संशय आणि स्पर्धा बाजूला ठेवून व्यापक सहकार्याचा मार्ग स्वीकारला, तरच भविष्यातील अशा संकटांना प्रभावीपणे सामोरे जाता येईल.

# अर्शिन मुस्तफा मोमीनचे दहावी परीक्षेत यश

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - देवा ग्रुप फाउंडेशन संगमनेर शहर अध्यक्ष मुस्तफा मोमीन तसेच जनता डेअरीचे मालक आयाज मोमीन यांची पुतणी अर्शिन मुस्तफा मोमीन हिने दहावीच्या परीक्षेत ८२.८० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



अर्शिन ही नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल, कोल्हेवाडी रोड येथील विद्यार्थिनी असून तिने आपल्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. या यशाबद्दल माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी अर्शिन हिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच देवा ग्रुप फाउंडेशन संगमनेर शहराच्या वतीनेही तिचा सत्कार करून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. यावेळी कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांनी अर्शिन हिचे कौतुक करत तिच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

तसेच न्युज बेगमपुरे आवाज तर्फेही कु. अर्शिन मुस्तफा मोमीनला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# वृंदावन इंग्लिश मीडियम स्कूलची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
तालुक्यातील चंदनपुरी घाटातील वृंदावन इंग्लिश मीडियम स्कूलने माध्यमिक शालांत परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले. प्रथम चार विद्यार्थ्यांनी नव्वद टक्क्याहून अधिक गुण मिळवत उच्च गुणवत्तेचा दर्जा पुन्हा सिद्ध केला.

डॉ. आर. इ. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशन संचलित वृंदावन इंग्लिश मीडियम स्कूलच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा निकाल नुकताच घोषित झाला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा, फेब्रुवारी २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. परीक्षेत बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून सलग सहा वर्षे शंभर टक्के निकालाची परंपरा राखण्यात विद्यालय यशस्वी झाले.

कु. श्रेया थोपटे आणि कु. रिद्धी भालेराव यांनी ९५.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, कु. पुनम सरोदे हिने ९४.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, कु. अनुश्री लेंडे हिने ९४.२० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक, कु. सिद्धी कुडेकर आणि सार्थक सागर यांनी ९०.८० टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक तर कु. अनुष्का रहाणे हिने ८९.६० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक पटकावला.

विद्यालयातील सर्व विद्यार्थी विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांना प्राचार्या वैशाली मंडलिक यांच्यासह सर्व विषय शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. स्कूलच्या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राधेश्याम गुंजाळ, सचिव तथा मॅनेजिंग डायरेक्टर राहुल गुंजाळ, स्कूलच्या डायरेक्टर सोनल गुंजाळ यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आपल्या व्यवसायाची जाहिरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक **युवावार्ता**
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहिरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर साडीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

समाज शुभचिंतक
मा.श्री. विजयराव डाके साहेब
आपणास
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
- शुभेच्छुक -
वेद-विज्ञान अनुसंधान संस्था, शिवपुरी, अक्कलकोट
अग्नीहोत्र परिवार, संगमनेर
विजयराव डाके मित्रपरिवार



# नऊशे कोटी खर्चूनही महिलांच्या डोक्यावरचा हंडा कायम

## जलजीवन मिशनचा फज्जा; कोट्यवधी रूपये पाण्यात, जिल्हा टँकरच्या भरोशावर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - देशभर गाजावाजा करत सुरू करण्यात आलेली केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी 'जलजीवन मिशन' योजना अहिल्यानगर जिल्ह्यात पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र समोर आले आहे. प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे शुद्ध पाणी पोहोचवण्याच्या घोषणा करण्यात आल्या, हजारो कोटींचा निधी मंजूर झाला, मोठमोठे भूमिपूजन सोहळे झाले; मात्र प्रत्यक्षात आजही ग्रामीण भागातील महिलांच्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा उतरलेला नाही. उलट भीषण उन्हाळ्यात नागरिकांना टँकरच्या दारात उभे राहून पाण्यासाठी झगडावे लागत आहे.

जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या नावाखाली तब्बल ९०० कोटी रुपये खर्च करण्यात आले; मात्र ८३० योजनांपैकी ५५६ योजना आजही अपूर्ण अवस्थेत आहेत. केवळ २७४ योजना पूर्ण झाल्या असून उर्वरित कामे रखडल्याने संपूर्ण यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नऊशे कोटी खर्चूनही पाणी मिळत नसेल तर या योजनांचा खरा फायदा नेमका कुणाला झाला? असा संतप्त सवाल आता ग्रामीण भागातून उपस्थित होत आहे.


एआय जनरेट

जिल्हा परिषदेकडून ८३० योजना हाती घेण्यात आल्या. या योजनांमुळे ९२७ गावांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटेल, असा दावा करण्यात आला होता. मात्र सहा वर्षे उलटल्यानंतरही बहुतांश योजना कागदावरच असल्याचे वास्तव समोर आले आहे. अनेक गावांत पाईपलाईन टाकण्यात आली, जलकुंभ उभारण्यात आले; पण नळातून पाणीच आले नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे जिल्ह्यातील ११२ मोठ्या पाणी योजना आहेत. या योजनांसाठी तब्बल साडेतीन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या ११२ योजनांपैकी केवळ ३ योजना पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित कामे अर्धवट अवस्थेत असून त्यावर दोन हजार कोटींपेक्षा अधिक खर्च झाल्याची माहिती समोर आली आहे. हजारो कोटींचा निधी खर्च होऊनही गावागावांत टँकर सुरू असल्याने प्रशासनाच्या नियोजनावर आणि कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. जलजीवन मिशनमुळे जिल्हा कायमस्वरूपी टँकरमुक्त होईल, असा दावा सरकारकडून करण्यात आला होता. मात्र वास्तव याच्या नेमके उलट आहे.

सद्यःस्थितीत जिल्ह्यातील ८९ गावे आणि ३९७ वाड्या-वस्त्यांमधील तब्बल १ लाख ३२ हजार ८९२ नागरिकांना ४७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. उन्हाचा तडाखा वाढत असल्याने टँकरची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

ग्रामीण भागातील महिलांना अजूनही पहाटेपासून विहिरी, बोअरवेल आणि टँकरसमोर रांगा लावाव्या लागत आहेत. घराघरात नळ ही घोषणा केवळ फलकांवर आणि जाहिरातींमध्येच दिसत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

### महिलांच्या डोक्यावरचा हंडा उतरेना!

**सरकारने टँकरमुक्त महाराष्ट्र, हर घर जल, महिलांची पाण्यासाठीची वणवण थांबवू अशा घोषणा केल्या; पण वास्तवात आजही ग्रामीण भागातील महिलांचे आयुष्य पाण्याच्या हंड्याभोवतीच फिरताना दिसत आहे.**

**एकीकडे हजारो कोटींचा खर्च दाखवला जातो, तर दुसरीकडे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते. त्यामुळे जलजीवन मिशन ही लोकांसाठी योजना ठरली की ठेकेदार आणि अधिकाऱ्यांसाठी कमाईचा मार्ग, असा संतप्त प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.**

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता - श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486, 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# सोनोग्राफी मशीनच्या मागावर पोलिस

## गर्भलिंग रॅकेटमध्ये १६ आरोपी, पाच डॉक्टरांचा समावेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - लोणी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली असून या रॅकेटचे धागेदोरे थेट पुण्यापर्यंत पोहोचल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात पोलिसांनी आणखी तीन जणांना अटक केली असून एकूण आरोपींची संख्या आता १६ वर पोहोचली आहे. विशेष म्हणजे, अटक करण्यात आलेल्यांमध्ये पाच डॉक्टरांचा समावेश असल्याने खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात यापूर्वी तीन डॉक्टर, चार एजंट आणि सहा गर्भवती महिलांच्या नातेवाईकांना अटक करण्यात आली होती. तपासादरम्यान पोलिसांनी बेकायदेशीर गर्भलिंग तपासणीसाठी वापरण्यात येणारी दोन सोनोग्राफी मशीन जप्त केली होती. त्यापैकी एक मशीन नेवासा येथील आरोपी डॉ. भणगे यांच्याकडून, तर दुसरे मशीन आरोपी रवींद्र ढगे याच्याकडून हस्तगत करण्यात आले होते. तपासात या दोन्ही मशीनचा वापर गर्भलिंग निदानासाठी होत असल्याचे स्पष्ट झाले असून संबंधित मशीनची कुठेही अधिकृत नोंदणी नसल्याचेही उघड झाले आहे. पोलीस कोठडीत आरोपींकडे सखोल चौकशी केली असता ही मशीन पुण्यातील काही डॉक्टर आणि एका व्यक्तीकडून खरेदी करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली.

• या माहितीनुसार पोलिसांनी डॉ. आकाश सुभाष मलगुंडे, डॉ. नीलकंठ अशोक जाधव आणि नरेंद्र साहेबराव ठाकरे यांना ताब्यात घेतले. विशेष पोलीस पथके रवाना करून तिघांनाही उशिरा रात्री लोणी पोलीस ठाण्यात आणण्यात आले आणि त्यांना या गुन्ह्यात अटक करण्यात आली. गुरुवारी तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. प्रतिबंधित सोनोग्राफी मशीन त्यांनी नेमकी कुठून मिळवली, त्यामागे आणखी कोणाचे नेटवर्क कार्यरत आहे का, याचा तपास आता पोलिसांकडून सुरू करण्यात आला आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैथूनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( 30 वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नाही होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्रे) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25